#जात

इथ बायांचा छळ हाय
उपभोग जिन्नसच
समाज पण लढतोय
पण ह्या देशात
बायाबायांच्यात
पण जात हाय

पायांत काय घातलं तर
धरणीचं पाप लागंत का
काटा पायात खुडण्यावजी त्योच मोडतो
ह्या देशात
सॉक्स अन बूट
घालणार्यांची पण जात हाय

ठिगळच लुगडं असतया हिकडं
घर्हाबाहेर अंग झाकण्यापायी
तिथं फकस्त घरातच अंग झाकायची प्रथा हाय
ह्या देशात
सुती साड्यांचे पांघरून
घेणार्यांची पण जात हाय

ह्यांना वेळेचं काय हाय
पोरगं हागल की दिस सुरू
नवर्यानंतर संपतो
ह्या देशात
चपण्या हातात फकस्त सोनेरी घड्याळ
घालणार्यांची पण जात हाय

ज्यांना कोणत्याही धातूचं डोरलं
गळयात घालावं लागतं
लांबूनच समाजातलं दिसावं म्हणून

ह्या देशात
फकस्त गळयात दोरीला अडकवलेला जवळच्या
नंबरचा चष्मा
घालणार्यांची पण जात हाय

त्यांना बाकीचं काय माहीत
घर म्हंजी त्रिजा
ह्या विस्तारलेल्या त्रिजेच्या
ह्या देशात
मोठ्या मापाची बिंदी
लावायची पण जात हाय

ह्यांना त्याचं काय देण घेणं
त्यात काय ते लपवायचं
स्वताच्या नाय श्रीमंताच्या पोराला पाजयची बोंड ती
ह्या देशात
सुती ब्लाऊजच्या आत पांढरा ब्रा
घालणार्यांची पण जात हाय